# STATE ELECTION COMMISSION
# MAHARASHTRA

No. SEC/MC-2022/C.R. 50/ Desk 5
New Administrative Building, First Floor,
Hutatma Rajguru Chowk,
Madame Cama Road, Mumbai 400 032.
email: sec.mh@gov.in
Tel.(O) 022-22045589/22027737
Date :- 04/08/2022

To,

**23 Municipal Commissioners,**

(14 Corporations namely MCGM, Thane, Ulhasnagar, Vasai Virar, Navi Mumbai, Kalyan Dombivali, Nasik, Pune, Pimpri-Chinchwad, Solapur, Kolhapur, Amravati, Akola and Nagpur)

(9 Corporations namely Aurangabad, Latur, Parbhani, Chandrapur, Malegaon, Panvel, Bhiwandi-Nijampur, Mira-Bhayander and Nanded- Waghala)

**Sub:- Stopping of all the process of reservation and voter list, until further orders**

**Ref:-** 1. Maharashtra Ordinance no VII of 2022.

2. Reservation Program dated 22/07/2022 of 13 Municipal Corporations and Mumbai Municipal Corporation.

3. Reservation Program dated 25/07/2022 of 9 Municipal Corporations

4. Amended Reservation Program dated 29/07/2022 for Vasai Virar and Ulhasnagar Municipal Corporation.

5. Voter List Program dated 25/07/2022 of 9 Municipal Corporations

Sir,

With reference to no. 2, 3, 4 and 5, the final notification for reservation of seats was to be issued in 12 Corporations and reservation of draw was to be made in 9 Corporations on 05/08/2022. Similarly, final

notification for reservation of seats was to be issued in 2 Corporations on 12/08/2022.

With reference to no. 1, the State has promulgated Ordinance no. VII of 2022, dated 04/08/2022; making Amendment to the Mumbai Municipal Corporation Act, 1888 and Maharashtra Municipal Corporation Act, 1949 and thereby has changed the total number of seats of the Municipal Corporations. It has also annulled all the process of delimitation and reservation done so far by State Election Commission and has provided that such process shall be started afresh.

In view of the Ordinance no VII of 2022, dated 04/08/2022 and provisions made thereunder, you are directed to stop the above stated process as on 04/08/2022 and wait for issuing the final notification and draw of lots for reservations as the case may till further orders.

By the Orders of Hon'ble State Election Commissioner.

Yours faithfully,

( Kiran Kurundkar)
Secretary,
State Election Commission,
Maharashtra.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक २२] गुरुवार, ऑगस्ट ४, २०२२/श्रावण १३, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.—** मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. | **पृष्ठे** १-४ |

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ४ ऑगस्ट २०२२.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VII OF 2022.**

*AN ORDINANCE*

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांत आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांत आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; १९४९ चा ५९.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (अ) मधील, "दोनशे छत्तीस" या मजकुराऐवजी "दोनशे सत्तावीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८८८ चा ३.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (अ) मधील तक्त्याऐवजी, पुढील तक्ता दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"**तक्ता**

| लोकसंख्या (१) | पालिका-सदस्यांची संख्या (२) |
| --- | --- |
| (एक) ३ लाखांपेक्षा अधिक व ६ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी असेल.<br><br>३ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १५,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्य कमाल संख्या, ८५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (दोन) ६ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ८५ इतकी असेल.<br><br>६ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक २०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या, ११५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (तीन) १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ११५ इतकी असेल.<br><br>१२ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ४०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या, १५१ पेक्षा अधिक होणार नाही. |

| लोकसंख्या (१) | पालिका-सदस्यांची संख्या (२) |
|---|---|
| (चार) २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या १५१ इतकी असेल.<br>२४ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ५०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या, १६१ इतकी असेल. |
| (पाच) ३० लाखांपेक्षा अधिक. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या १६१ इतकी असेल.<br>३० लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १ लाख इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या १७५ इतकी असेल.”. |

## प्रकरण चार

### संकीर्ण

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. सन २०२२ चा महा. अध्या. ७.

प्रक्रिया रद्द करणे.

**४.** मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात ज्यांचा निर्देश, “ उक्त अधिनियम ” असा केला आहे) आणि त्याखाली केलेले नियम, काढलेल्या अधिसूचना किंवा काढलेले आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी,—

(क) महानगरपालिकांच्या क्षेत्रांची प्रभागांमध्ये विभागणी करण्याची आणि त्यांच्या सीमा विनिर्दिष्ट करण्याची प्रक्रिया, राज्य निवडणूक आयुक्ताने, किंवा यथास्थिति, राज्य शासनाने सुरू केली असेल किंवा पूर्ण केली असेल तेथे, किंवा

(ख) महानगरपालिकांमधील पालिका-सदस्यांच्या जागांच्या आरक्षणाची प्रक्रिया, राज्य निवडणूक आयुक्ताने सुरू केली असेल किंवा पूर्ण केली असेल तेथे,

ती प्रक्रिया, रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि अशी प्रक्रिया, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या तरतुदींनुसार नव्याने करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) जर या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, उक्त अधिनियमांच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, उक्त अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याच्या कलम ५ मध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील प्रभाग निवडणुकांमध्ये प्रत्यक्ष निवडून आलेल्या पालिका सदस्यांच्या संख्येची तरतूद केली आहे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम ५ मध्ये, संबंधित महानगरपालिकेच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निवडून आलेल्या पालिका सदस्यांच्या किमान व कमाल संख्येची तरतूद केली आहे.

२. नागरी लोकसंख्येमधील वाढ व नागरीकरणातील जलद वाढ विचारात घेऊन, २०११ च्या जनगणनेच्या संख्येच्या आधारे व २०२१-२०२२ मधील लोकसंख्येच्या परिकल्पित गणनेच्या आधारे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील पालिका-सदस्यांची संख्या आणि इतर महापालिकांच्या निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान व कमाल संख्या, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ आणि सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ यांद्वारे अनुक्रमे, वाढवण्यात आली आहे.

तथापि, २०२१ ची जनगणना पूर्ण झाल्यानंतर, त्यानुसार लोकसंख्येच्या आकडेवारीच्या आधारे, महापालिकांच्या पालिका-सदस्यांची संख्या विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटते.

३. बृहन्मुंबईच्या क्षेत्राचे प्रभागांमध्ये विभाजन करण्याचा आणि त्याच्या सीमा विनिर्दिष्ट करण्याचा, आणि पालिका-सदस्यांच्या प्रभाग निवडणुकीच्या प्रयोजनार्थ, प्रत्येक शहर ज्या प्रभागात विभागले जाईल त्या प्रभागांची संख्या व सीमा अशा शहरांसाठी विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्याकरिता सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याद्वारे उक्त महानगरपालिका अधिनियमांमध्ये सुधारणा केली आहे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने, राहुल रमेश वाघ विरुद्ध महाराष्ट्र राज्य (एस.एल.पी.(सी) क्र.२०२१ चा १९७५६) या प्रकरणी, दिलेल्या त्याच्या दिनांक ४ मे २०२२ व २० जुलै २०२२ रोजीच्या आदेशांद्वारे, उक्त सुधारणा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांक ११ मार्च २०२२ रोजी व त्यापूर्वी केलेल्या परिसीमनाच्या आधारे, निवडणूक कार्यक्रम अधिसूचित करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत.

४. वरील वस्तुस्थिती विचारात घेता, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ आणि सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या प्रारंभापूर्वी असलेली पालिका-सदस्यांची संख्या, पुनःस्थापित करण्यासाठी उक्त महानगरपालिका अधिनियमांच्या कलम ५ मध्ये योग्य त्या सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियमात व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२२.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सोनिया सेठी,**
शासनाच्या प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ८, अंक ३०] गुरुवार, ऑगस्ट ४, २०२२/श्रावण १३, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ६०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause *(3)* of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Mumbai Municipal Corporation and Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2022 (Mah. Ord. VII of 2022), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Mumbai Municipal Corporation and Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2022 (Mah. Ord. VII of 2022), published under the authority of the Governor).

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**
Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 4th August 2022.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VII OF 2022.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Mumbai Municipal Corporation Act and the Maharashtra Municipal Corporations Act .*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Mumbai Municipal Corporation Act and the Maharashtra Municipal Corporations Act, for the purposes hereinafter appearing; III of 1888. LIX of 1949.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely:-

## CHAPTER I
## PRELIMINARY

Short title and commencement.

1. (*1*) This Ordinance may be called the Mumbai Municipal Corporation and Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2022.

(*2*) It shall come into force at once.

## CHAPTER II
## AMENDMENT TO THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

Amendment of section 5 of III of 1888.

2. In section 5 of the Mumbai Municipal Corporation Act, in sub-section (*2*), in clause (*a*), for the words "two hundred and thirty-six" the words "two hundred and twenty-seven" shall be substituted. III of 1888.

## CHAPTER III
## AMENDMENT TO THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

Amendment of section 5 of LIX of 1949.

3. In section 5 of the Maharashtra Municipal Corporations Act, in sub-section (*2*), in clause (*a*), for the TABLE, the following TABLE shall be substituted, namely :-- LIX of 1949.

"TABLE

| | Population (1) | Number of Councillors (2) |
|---|---|---|
| (*i*) | Above 3 lakhs and upto 6 lakhs | The minimum number of elected Councillors shall be 65.<br>For every additional population of 15,000 above 3 lakhs, there shall be one additional Councillor, so however that, the maximum number elected Councillors shall not exceed 85. |
| (*ii*) | Above 6 lakhs and upto 12 lakhs | The minimum number of elected Councillors shall be 85.<br>For every additional population of 20,000 above 6 lakhs, there shall be one additional Councillor, so however that, the maximum number of elected Councillors shall not exceed 115. |
| (*iii*) | Above 12 lakhs and upto 24 lakhs | The minimum number of elected Councillors shall be 115.<br>For every additional population of 40,000 above 12 lakhs, there shall be one additional Councillor, so however that, the maximum number of elected Councillors shall not exceed 151. |
| (*iv*) | Above 24 lakhs and upto 30 lakhs | The minimum number of elected Councillors shall be 151.<br>For every additional population of 50,000 above 24 lakhs, there shall be one additional Councillor, so however that, the maximum number of elected Councillors shall be 161. |
| (*v*) | Above 30 lakhs | The minimum number of elected Councillors shall be 161.<br>For every additional population of 1 lakh above 30 lakhs, there shall be one additional Councillor, so however that, the maximum number of elected Councillors shall be 175.". |

## CHAPTER IV
## MISCELLANEOUS

Annulment of process.

4. Notwithstanding anything contained in the Mumbai Municipal Corporation Act and the Maharashtra Municipal Corporations Act (hereinafter, in this Chapter, referred to as "the said Acts") and the rules, notifications or orders made thereunder, where the process,- III of 1888. LIX of 1949.

*(a)* to divide the area of Municipal Corporations, into wards and to specify the boundaries thereof is started or completed by the State Election Commissioner or the State Government, as the case may be, or

*(b)* of reservation of seats of Councillors in the Municipal Corporations is started or completed by the State Election Commissioner,

before the date of commencement of the Mumbai Municipal Corporation and Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2022, shall be deemed to be annulled and such process shall be done afresh according to the provisions of the said Acts as amended by this Ordinance. Mah. Ord. VII of 2022.

Power to remove difficulties.

5. *(1)* If any difficulty arises in giving effect to the provisions of the said Acts, as amended by this Ordinance, the State Government may, by an order published in the *Official Gazette*, as the occasion arises, make such provisions not inconsistent with the provisions of the said Acts, as amended by this Ordinance, as may appear to it to be necessary or expedient for the purposes of removing the difficulty.

*(2)* Every order made under this section shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

## STATEMENT

Section 5 of the Mumbai Municipal Corporation Act (III of 1888) provides for the number of Councillors directly elected at ward elections in Municipal Corporation of *Brihan* Mumbai and section 5 of the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949) provides for minimum and maximum number of elected Councillors in proportion to the population of the respective Corporation.

2. By the Maharashtra Act No. II of 2022 and the Maharashtra Act No. XII of 2022, the numbers of Councillors in the Municipal Corporation of *Brihan* Mumbai and minimum and maximum number of elected Councillors of other Corporations have been increased considering growth in urban population and the speed of urbanisation, on the basis of figures of Census 2011 and hypothetical calculation of population in 2021-2022, respectively.

However, it is considered expedient to specify the number of Councillors of Corporations on the basis of figures of population as per Census 2021 after it is completed.

3. The said Corporation Acts are amended by the Maharashtra Act No. XXI of 2022 to take power to the State Government to divide the area of *Brihan* Mumbai into wards and to specify the boundaries thereof, and to specify for each City the number and boundaries of the wards into which such City shall be divided for the purpose of the ward election of Councillor.

The Hon'ble Supreme Court in *Rahul Ramesh Wagh Vs. State of Maharashtra (S.L.P.(C) No. 19756 of 2021),* has *vide* its orders dated the 4th May 2022 and 20th July 2022, directed the Election Commission to notify the election programme on the basis of delimitation done prior to coming into force of the said amendment Acts w.e.f. the 11th March 2022.

4. In view of the above, it is considered expedient to amend sections 5 of the said Acts, suitably, to reinstate the number of Councillors prior to the Maharashtra Act No. II of 2022 and Maharashtra Act No. XII of 2022.

5. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Mumbai Municipal Corporation Act and the Maharashtra Municipal Corporations Act, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 3rd August 2022.

BHAGAT SINGH KOSHYARI,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SONIA SETHI,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.